16 OCT 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्याभिषेक वर्णन करणाऱ्या मजकुराचे २९७ कॉलेजमध्ये एकाचवेळी वाचन

■ वाचन प्रेरणादिनी शिवाजी विद्यापीठाचा अनोखा उपक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

'या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती जाला, ही गोष्ट काही सामान्य जाली नाही, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे प्रत्यक्षदर्शी बखरकार कृष्णाजी अनंत सभासद यांनी या सोहळ्याचे महत्त्व विषद करणारे उपरोक्त विधान केले. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठासह संलग्नित २९७ महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून पंधरा मिनिटांच्या कालावधीत शिवराज्याभिषेक दिन स्मृतींचा जागर केला.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो. यंदाच्या वर्षापासून त्याची व्याप्ती महाविद्यालयांपर्यंत वाढवून सर्व संबंधित घटकांना सामावून घेऊन वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले. हा उपक्रम विद्यापीठासह सर्व संलग्नित महाविद्यालयांत एकाच वेळी राबविण्यात आला. यंदाच्या वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन असणारा मजकूर विद्यापीठामार्फत सर्व अधिविभाग व महाविद्यालयांना पाठविण्यात आला. याच मजकुराचे १०.४५ ते ११ वाजेपर्यंतच्या कालावधीत वाचन करून विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी आदी संबंधित घटकांनी शिवराज्याभिषेकाच्या स्मृती जागविल्या.

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पूण करून करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्र जमून डॉ. सदानंद मोरे संपादित 'शिवराज्याभिषेक' या ग्रंथातील सोहळ्याशी संबंधित उताऱ्यांचे मूकवाचन केले. वाचन प्रेरणा दिन समितीचे अध्यक्ष व व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी स्वागत करून उपक्रमाचा हेतू विषद केला. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. राजेंद्र खामकर, डॉ. के. डी. कुचे, डॉ. एस. एस. कुंभार, डॉ. जे. पी. खराडे, डॉ. जे. पी. भोसले, एस. डी. थिटे, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

16 OCT 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकाच वेळी विद्यार्थ्यांकडून शिवराज्याभिषेकाचा स्मृतिजागर

## विद्यापीठाचा वाचन प्रेरणा दिनाचा अनोखा उपक्रम; विविध २९७ महाविद्यालयांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : 'या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा. मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती जाला, ही गोष्ट काही सामान्य जाली नाही...' छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे प्रत्यक्षदर्शी बखरकार कृष्णाजी अनंत सभासद यांनी या सोहळ्याचे महत्त्व विषद करणारे उपरोक्त विधान केले. मंगळवारी वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठासह संलग्नित २९७ महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी सकाळी पावणेअकरा ते अकरा यावेळेत शिवराज्याभिषेक दिनाच्या स्मृतींचा जागर केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात सहभागी झालेले न्यू कॉलेजमधील शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी.

विद्यापीठातर्फे दरवर्षी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो. यंदा त्याची व्याप्ती महाविद्यालयांपर्यंत वाढवून सर्व संबंधित घटकांना सामावून घेण्यात आले. मंगळवारी सकाळी साडेदहा ते अकरा यावेळेत हा उपक्रम विद्यापीठासह सर्व संलग्नित महाविद्यालयांत एकाच वेळी राबविण्यात आला. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून राज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन असणारा मजकूर विद्यापीठातर्फे सर्व अधिविभाग व महाविद्यालयांना पाठविण्यात आला. या मजकुराचे वाचन शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केले.

विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. राजर्षी शाहू सभागृहात अधिकारी, कर्मचाऱ्यांनी डॉ. सदानंद मोरे संपादित 'शिवराज्याभिषेक' या ग्रंथातील सोहळ्याशी संबंधित उताऱ्यांचे मूकवाचन केले. डॉ. रघुनाथ ढमकले यांनी स्वागत केले. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. धनंजय सुतार, श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख आदी उपस्थित होते.

### अधिविभाग, महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम

वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यापीठातील अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांनी आपापल्या परिसरात ग्रंथदिंडीसह अनेकविध उपक्रम राबविले. महाविद्यालयांतील सभागृहे, मैदाने यांसह विविध वर्गांमध्येही विद्यार्थी, शिक्षकांनी एकत्रितपणे शिवराज्याभिषेकाशी संबंधित उताऱ्यांचे वाचन केले.


16 OCT 2024

हॅलो प्रभात

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# विद्यापीठासह महाविद्यालयात शिवराज्याभिषेकाचा स्मृतीजागर

## वाचन प्रेरणा दिनाच्या अनोख्या उपक्रमात हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग




कोल्हापूर : हॅलो प्रभात

या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा. मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती जाला ही गोष्ट काही सामान्य जाली नाही.. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे प्रत्यक्षदर्शी बखरकार कृष्णाजी अनंत सभासद यांनी या सोहळ्याचे महत्त्व विषद करणारे उपरोक्त विधान केले. आज वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठासह संलग्नित २९७ महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सकाळी १०.४५ ते ११.०० या पंधरा मिनिटांच्या कालावधीत शिवराज्याभिषेक दिनाच्या स्मृतींचा जागर करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने दरवर्षी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो. यंदाच्या वर्षापासून त्याची व्याप्ती महाविद्यालयांपर्यंत वाढवून सर्व संबंधित घटकांना सामावून घेऊन वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले. आज सकाळी १०.३० ते ११ वा. या कालावधीत हा उपक्रम विद्यापीठासह सर्व संलग्नित महाविद्यालयांत एकाचवेळी राबविण्यात आला. यंदाच्या वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन असणारा मजकूर विद्यापीठामार्फत सर्व अधिविभाग व महाविद्यालयांना पाठविण्यात आला.

याच मजकुराचे १०.४५ ते ११ वाजेपर्यंतच्या कालावधीत वाचन करून विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी आदी संबंधित घटकांनी शिवराज्याभिषेकाच्या स्मृती जागविल्या. शिवाजी विद्यापीठात सकाळी ठीक साडेदहा वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्याहस्ते भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2024
लोकमत

# शिवराज्याभिषेकाचा २९७ महाविद्यालयांत स्मृती जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने मंगळवारी शिवाजी विद्यापीठासह संलग्नित २९७ महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सकाळी १०:४५ ते ११ या पंधरा मिनिटांच्या कालावधीत शिवराज्याभिषेक दिनाच्या स्मृतींचा जागर करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन असणारा मजकूर विद्यापीठामार्फत सर्व अधिविभाग व महाविद्यालयांना पाठविला. याच मजकुराचे वाचन करून विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी या संबंधित घटकांनी शिवराज्याभिषेकाच्या स्मृती जागविल्या. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून जयंतीनिमित्त अभिवादन केले. त्यानंतर विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात डॉ. सदानंद मोरे संपादित 'शिवराज्याभिषेक' या ग्रंथातील सोहळ्याशी संबंधित उताऱ्यांचे मूकवाचन केले. डॉ. रघुनाथ ढमकले यांनी स्वागत केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2024

लोकमत

# घाळी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

गडहिंग्लज : शहरातील डॉ. घाळी महाविद्यालयाच्या मराठी विभाग व एम. एन. कोल्हापुरे ग्रंथालयातर्फे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. प्र. प्राचार्य दत्ता पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी नीलेश शेळके, नागेश मासाळ, शिवानंद मस्ती, वंदना खोराटे, राजेंद्र सावेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
16 OCT 2024
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# कोल्हापूरची कलापरंपरा चित्रकार, शिल्पकारांनी जतन केली : कुलगुरू

## त्रिकोण चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन : २१ ऑक्टोबरपर्यंत खुले

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोल्हापूरच्या कलापरंपरेमध्ये अनेक कलारत्न जन्माला आली. ही परंपरा जतन करण्याची जबाबदारी आजवर अनेक चित्रकार आणि शिल्पकारांनी लीलया पेलली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी. टी. शिर्के यांनी केले.

कोल्हापुरातील शाहू स्मारक भवन येथे बबन माने, राजेंद्र सुतार आणि विजय चोकाककर या चित्रकारांच्या संकल्पनेतून त्रिकोण चित्रप्रदर्शन भरवण्यात आले आहे. हे प्रदर्शन २१ ऑक्टोबरपर्यंत सकाळी १०.३० ते रात्री ८ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले असणार आहे. याचे उद्घाटन मंगळवारी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले,



कोल्हापुरात शाहू स्मारक भवन येथे मंगळवारी त्रिकोण चित्रप्रदर्शनाची पाहणी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली.

यावेळी विद्यापीठाचे माजी संचालक विद्यार्थी विकास केंद्राचे पी.टी. गायकवाड, नाट्य व संगीत विभागाचे विनोद ठाकूर-देसाई, शिल्पकार सतीश घारगे, चित्रकार सुनील पंडित, चित्रकार विजय टिपुगडे, चित्रकार अशोक धर्माधिकारी, आर. एस. कुलदीप, कलाशिक्षक संजय कुंभार, छायाचित्रकार सर्वेश देवरुखकर, देवयानी देवरुखकर उपस्थित होते. संग्राम भालकर यांनी सूत्रसंचालन केले. बबन माने यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2024
तरुण भारत

# 'डॉ. तारा भवाळकर प्रागतिक स्त्रीवादी संशोधक, साहित्यिक'

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठी भाषेला अभिजात दर्जा घोषित झाला असतानाच डॉ. तारा भवाळकर यांच्यासारख्या प्रागतिक स्त्रीवादी संशोधक-साहित्यिकेचा नवी दिल्ली येथे नियोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होणे हा अत्यंत चांगला संकेत असल्याचे गौरवोद्गार, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.


नवी दिल्ली येथे होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक, संशोधक व समीक्षक असलेल्या डॉ. तारा भवाळकर यांची नुकतीच निवड करण्यात आली. त्या निमित्ताने कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगली येथील त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन विद्यापीठाच्या वतीने सत्कार केला. यावेळी ते बोलत होते.

डॉ. भवाळकर यांनी शिवाजी विद्यापीठाशी माझा खूप जुना स्नेह आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ परिवाराच्या वतीने कुलगुरूंनी केलेला गौरव हा मला माझ्या कुटुंबियांनीच केला आहे असे वाटते, अशी भावनाव्यक्त केली. यावेळी शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अविनाश सप्रे उपस्थित होते.



कोल्हापूर : डॉ. तारा भवाळकर यांचा सांगली येथील निवासस्थानी सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अविनाश सप्रे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2021
तरुण भारत



कोल्हापूर : जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात पथनाट्य सादर करताना मानसशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी – विद्यार्थिनी.

# 'शिक्षण, करिअरच्या दृष्टीने युवकांनी मानसिक आरोग्य जपावे'

प्रतिनिधी
कोल्हापूर

आजच्या काळात शिक्षण व करिअरच्या दृष्टीने युवकांचे मानसिक आरोग्य चांगले असणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत समाजामध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी नुकतेच केले. शिवाजी विद्यापीठातील मानसशास्त्र अधिविभाग आणि व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून मानसिक आरोग्य सप्ताह साजरा करण्यात आला. या निमित्ताने पोस्टर प्रदर्शन, जनजागृती रॅली व पथनाटय आदी उपक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. शिर्के व प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. मानसशास्त्र अधिविभागातील पोस्टर प्रदर्शन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठ परिसरातून जनजागृती रॅली काढण्यात आली.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, मानसशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. अश्विनी पाटील, समुपदेशक उर्मिला शुभंकर, मिलींद सावंत, साक्षी गावडे, विशाल पाटील, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

16 OCT 2024

महान कार्य

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## इचलकरंजी शहर

# विषारी रंग, रसायनाचे विद्राव्य करणार सूर्य प्रकाश


**इचलकरंजी/सुभाष भस्मे**

वस्त्रोद्योगातील हानिकारक रंग, रसायनांमुळे होणारे प्रदुषण कमी होण्यास आता मदत होणार आहे. शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्रज्ञांनी यावर संशोधन केले असून या संशोधनाला युकेचे पेटंटही प्राप्त झाले आहे. याचा सर्वाधिक लाभ इचलकरंजीला होणार आहे. रसायनशास्त्र विभागाचे डॉ. के. एम. गरडकर यांनी डॉ. नाना गावडे, डॉ. संतोष बाबर आणि डॉ. महादेव सुवर्णकार यांच्या मदतीने हे संशोधन यशस्वी केले आहे.

वस्त्रोद्योगांसह सर्वच उद्योगांत रसायने आणि नैसर्गिक संसाधनांचा व्यापक वापर केला जातो. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यामध्ये नैसर्गिकदृष्ट्या नष्ट न होऊ शकणारे अजैविक, रासायनिक सेंद्रिय घटक असतात. ते कित्येकदा कोणत्याही प्रक्रियेविना थेट नद्या, नाले

## पिण्यायोग्य पाणी तयार होणार

पर्यावरणपूरक मेटल ऑक्साईड नॅनोकम्पोझिट अत्यंत सोप्या पद्धतीने तयार करून त्यांचा वापर उत्प्रेरक म्हणून केला. ही संपूर्ण प्रक्रिया सूर्यप्रकाशात घडवून आणली जाते. याअंतर्गत पर्यावरणाला हानिकारक असणारी रंगद्रव्ये पूर्णपणे नष्ट करून पिण्यायोग्य पाणी तयार होणार आहे. असा दावा गरडकर यांनी केला आहे.



**महान कार्य विशेष**

आणि समुद्रात सोडले जातात. त्यामुळे जलप्रदूषणाची समस्या ही जागतिक पातळीवर एक डोकेदुखी होऊन बसली आहे. या प्रकारचे जलप्रदूषण टाळण्यासाठी औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते शुद्ध करून पुनर्वापरायोग्य करणे आवश्यक आहे. औद्योगिक सांडपाणी शुद्ध करण्यासाठी नॅनोमटेरियल फोटोकॅटॅलिस्ट हा एक प्रभावी आणि आर्थिकदृष्ट्या किफायतशीर पर्याय आहे. त्या दिशेने संशोधनाची दिशा केंद्रित करून सूर्यप्रकाशात रंगद्रव्यांवर प्रक्रिया करण्याची पद्धती शोधून काढण्यात यश आले. भविष्यात देखील सोप्या हरित पद्धतीने आणि सूर्यप्रकाशात काम करणारे आणखी क्रियाशील नॅनोमटेरियल फोटोकॅटॅलिस्ट तयार करून पर्यावरणाची हानी टाळण्याच्या दृष्टीनेही संशोधन करण्यात आले आहे.

## छोट्या उद्योगांना दिलासा देणारे संशोधन

जलप्रदूषणाची तीव्रता दिवसेंदिवस गंभीर



होत आहे. आम्ही केलेले संशोधन हे छोट्या उद्योजकांना दिलासा देणारे आहे. सात आठ छोटेउद्योजक एकत्र येऊन या प्लांट च्या माध्यमातून रसायन युक्त पाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी बाहेर सोडू शकतात.

**–प्रा.डॉ.के.एम.गरडकर**

## गरडकरांचे १५० हून अधिक शोधनिबंध

डॉ. के. एम. गरडकर हे रसायनशास्त्र अधिविभागातील वरिष्ठ प्राध्यापक असून नुकत्याच जाहीर झालेल्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांमध्ये त्यांचा समावेश आहे. केवळ नॅनोमटेरियल या विषयावर त्यांचे १५० हून अधिक शोधनिबंध विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. या सर्व संशोधकांचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2024
तरुण भारत

# शेळोशी येथील शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

गगनबावडा : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट अधिविभागाच्या समाजकार्य अभ्यासक्रमाअंतर्गत शेळोशी ता.गगनबावडा येथे आयोजित केलेल्या पाच दिवसीय अभ्यास दौऱ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सरपंच सौ भारती कांबळे यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन झाले. समन्वयक उर्मिला यशवंत, उपसरपंच दशरथ पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पहिल्या दिवशी दि.७ रोजी येथील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसमवेत गावात मशालफेरी काढण्यात आली. दुसऱ्या दिवशी शिवार फेरी काढण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्या सीमा पाटील,विजय पाटील, रघुनाथ पाटील, कृष्णात पाटील, पोलीस पाटील नामदेव पाटील, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दिनकर पाटील,उत्तम पाटील,एस.के.पाटील इत्यादीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 OCT 2024
पुण्यनगरी



## विज्ञान-तंत्रज्ञान

# ऐकावं ते नवल.. नाही!

डॉ. व्ही.एन. शिंदे



वाळवंटात, तेही सहारा वाळवंटात ऐन उन्हाळ्यात महापूर, उत्तराखंडमध्ये मोराचे दर्शन ६५०० फूट उंचीवर, अर्जेंटिना पोपटांशी लढाई करतोय, या बातम्या तशा न घटणाऱ्या. तसेच अपवाद म्हणून सोडाव्या अशाही नाहीत. या बातम्यांनी मन अस्वस्थ झाले. या तीन बातम्यांचे मूळ जागतिक तापमान वाढ आहे, हे लक्षात येत होते. तोपर्यंत जुनीच पण पुन्हा नव्याने आलेली बातमी कानावर पडते; मुंबई, ठाणे आणि नव्या मुंबईचे आयुष्य केवळ ३१ वर्षांचे आहे. या सर्व बातम्या आपल्या दैनंदिन जीवनात वाचून सोडून देतो, मात्र या बातम्यांतून मिळणारा इशारा फार गंभीर आहे. याबाबत गांभीर्याने विचार करून उपाय योजण्याची गरज आहे. त्यालाही आता उशीर झाला आहे, मात्र कधीच नाही, यापेक्षा उशिराने सही... आता तरी जागे व्हायलाच हवे.

जगातील सर्वात मोठ्या सहारा वाळवंटामध्ये दरवर्षी सरासरी एक ते २५० मिलिमीटर इतका पाऊस पडतो. मात्र, मागील आठवड्यात सलग दोन दिवस इतका पाऊस पडला की, वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा तलावात जमा झाला. वाळूच्या खालूनही पाणी वाहत आहे. चक्रीवादळ आणि पावसाने मातीची घरे पडली. मोठा विध्वंस झाला. मागील काही दिवसांतील पावसाने सहारा वाळवंटाचा भाग हिरवा झाला आहे. या सातत्याने पडणाऱ्या पावसाने सर्वांनाच चकित केले आहे.

एकीकडे इस्त्रायल व इराण, तसेच रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाने जोर पकडला आहे. विज्ञान, तंत्रज्ञानाच्या प्रगतीतून विकसित झालेली शस्त्रास्त्रे नव्हे तर उपकरणाच्या सहाय्याने युद्ध लढले जात आहे. पेजरचे आणि वॉकीटॉकीचे स्फोट घडवून शत्रूची ताकत कमी करण्यात येत आहे. अशा वातावरणात अर्जेंटिना पोपटांशी लढत आहे. पोपटांच्या टोळधाडीने अर्जेंटिनातील लोकांचे जगणे अवघड केले आहे. या युद्धात केवळ लष्कर नाही तर सर्वसामान्य जनताही सहभागी झाली आहे. कधीतरी कानावर पडणारा पोपटाचा 'मिठू, मिठू' आवाज गोड वाटतो. मात्र, हजारो पोपटांच्या कलकलाटात लोकांचे जगणे अवघड झाले. घरांच्या खिडक्या, दरवाजे लावणेही लोकांना कठीण बनले. पोपट चक्क घरात घुसून सर्वत्र घाण करताहेत. पोपट एकेकटे नाही तर हजारोंच्या झुंडीने एकत्र फिरताहेत. विद्युत, टेलिफोन ताराही या पोपटांनी तोडल्या. पाणीपुरवठा विस्कळीत झाला. त्यातून जीवनावश्यक वस्तुंचा तुटवडा निर्माण झाला. त्यांच्यापासून संरक्षण मिळत नसल्याने लोकांचा रोष वाढला. सरकारी यंत्रणा अपुरी पडत असल्याचे लक्षात येताच, लोकांनी आता पोपटांविरुद्ध लढायला सुरुवात केली आहे. पोपटांचे असे अचानक एका देशात स्थलांतर करून विक्षिप्त वागणेही तापमान वाढ हेच कारण सांगण्यात येत आहे.

पोपटाप्रमाणेच उत्तराखंडमध्ये मोरांचे वागणे बुचकळ्यात टाकणारे आहे. मोरांचे वास्तव्य साधारण १६०० फुटापर्यंत असते. मात्र, मोरांचे दर्शन आता ६५०० फुटांवर होऊ लागले आहे. ही गोष्ट एखादवेळी असेल तर चुकून मोर भरकटला असे मानतात. मात्र, वारंवार असे मोरदर्शन होत आहे. याचाच अर्थ आता मोराला खाली राहणे असह्य होत आहे. निळा, हिरवा आणि पांढरा मोर हे फॅसिनेडी कुलातील मोर मूळचे भारतातील. आज त्याचे दर्शन अनेक देशात होत आहे. मोराचे हे एवढ्या उंचावर जाणे, जागतिक तापमान वाढीचा परिणाम असल्याचे संशोधकांचे मत आहे.

कारखाने, उद्योग, घरगुती वापर, अवैज्ञानिक पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावणे या सर्व गोष्टीतून हवा, पाणी प्रदूषित होते. एखाद्या देशातील नागरिक प्रती व्यक्ती, प्रती दिन किती ऊर्जा वापरतो, यावर त्या देशाची प्रगती किती झाली हे मोजले जाते. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र आपल्या देशात जास्तीत जास्त ऊर्जा कमीत कमी खर्चामध्ये कशी उपलब्ध होईल या दृष्टीने प्रयत्न करतात. स्वस्तात ऊर्जा मिळवताना लाकूड, दगडी कोळसा, खनिज तेल यांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. विद्युत ऊर्जा निर्मितीही कोळसा आणि डिझेलचा वापर करून केली जाते. यातून मोठ्या प्रमाणात कार्बन डाय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड वातावरणात सरळ सोडले जातात. त्याचप्रमाणे नायट्रोजन, सल्फर यांचीही ऑक्सईडस वातावरणात मिसळतात. हे सर्व वायू मोठ्या प्रमाणात उष्णता शोषतात. त्याचा परिणाम म्हणून वातावरणाच्या तापमानात वाढ होत आहे, याचा परिणाम समग्र जीवसृष्टीवर होतो. वातावरणावर, जीवसृष्टीवर याचे मोठे परिणाम होताहेत. पृथ्वीवरील पाण्याचा मोठा वाटा हा बर्फाच्या स्वरूपात आहे.

वातावरणातील बदलाचा परिणाम म्हणून तापमानातील वाढ होते. त्याचा परिणाम म्हणून बर्फ वितळत आहे. हा वितळलेला बर्फ पाण्याच्या रूपात उताराने वाहतो. अखेर ते पाणी समुद्राला जाऊन मिळते. बर्फ एवढ्या मोठ्या प्रमाणात वितळतो की, समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत आहे. समुद्राच्या पाण्याची पातळी एवढ्या मोठ्या वेगाने वाढत आहे की, समुद्रकिनारी असणारी अनेक गावे आता निर्मनुष्य झाली आहेत. ब्रम्हपुत्रा नदी जेथे समुद्राला मिळते, त्या ठिकाणची अनेक खेडी पाण्याखाली यापूर्वीच गेली आहेत. मुंबई, ठाणे, नवी मुंबई या शहरात, अनेक ठिकाणी समुद्रात भराव घालून इमारती उभा करण्यात आल्या आहेत. या भरावामुळे समुद्राच्या पातळीमध्ये वाढ होते किंवा नाही याची माहिती मिळत नाही. याखेरीज समुद्रामध्ये भरला जाणारा कचरा आणि वाहून येणारा गाळ हाही समुद्राची पातळी वाढवण्याचे कारण आहे.

आपण एखाद्या शहरात नोकरी, कामधंद्यानिमित्त जातो. तेथेच राहतो. आवडेल असे घर घेतो. मात्र, ते घर समुद्रकिनारी भराव टाकून बांधलेले घर असू शकते. मात्र मुंबई, ठाण्यासह, कोलकत्ता शहरांना थेट धोका निर्माण झाला आहे. या शहरांना केवळ ३१ वर्षांचे आयुष्य शिल्लक आहे, असे संशोधकांचे मत आहे. २०५० पर्यंत या शहरांना जलसमाधी मिळेल. गेट वे ऑफ इंडिया, नरिमन पॉईंट, कुलाबा, शिवाजी पार्क, सीएसएमटी, दादर, वांद्रा, चेंबूर ही ठिकाणे पाण्याखाली असतील असा अंदाज आहे. सुरत या महत्त्वाच्या व्यापारी केंद्र असणाऱ्या शहरालाही धोका निर्माण झाला आहे. एकूण दहा देशांच्या लोकसंख्येवर याचा परिणाम होणार आहे. बांगलादेशातील २.५ कोटी, चीनच्या दोन कोटी, फिलिपाईन्सचे दीड कोटी लोकांना फटका बसणार आहे, म्हणूनच वाचायला मिळणाऱ्या बातम्या नवल नाहीत!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००